**Price Rs.: 3/-**

स्टेट बँक ऑफ इंडिया, पेन्शनर्स असोसिएशन, (मुंबई सर्कल), पुणे

*ह्यांची गृहपत्रिका*

# संवाद

*मनामनांचा मेळ जुळावा द्वेषाचा लवलेश नसावा*

*सादासी प्रतिसाद मिळावा वाद नको संवाद असावा*

*वर्ष तिसरे* *अंक बारावा* *जानेवारी २००७* (January-2007)

## संपादकीय

प्रथम सर्व सभासदांना नवीन वर्षाच्या शुभेच्छा ! २००७ हे वर्ष सर्व सभासद बंधु-भगिनींना सुखा समाधानाचे, भरभराटीचे आणि आरोग्यपूर्ण जावो ही सदिच्छा !

२००६ ह्या वर्षाला Good bye करून आपण आता २००७ मध्ये प्रवेश करीत आहोत. गेल्या वर्षभरात केलेल्या कामाचा आढावा व घडलेल्या सुखद/दु:खद प्रसंगांचे अनुभव गाठीशी बांधून आपणांस पुढील वर्षात वाटचाल करायची आहे.

आपल्या संघटनेच्या पातळीवर झालेल्या घटनांची नोंद वेळोवेळी 'संवाद' मध्ये घेतली जातेच.

गेल्या वर्षात 'संवाद' च्या माध्यमातून बरेच दर्जेदार साहित्याचे लिखाण सभासदांकडून लिहिले गेले आहे. त्यात कथा, कविता, व्यक्तिचित्रे, व्यक्तिपरिचय, प्रवास वर्णने, विनोद, व्यंगचित्रे, वैचारिक लेख इत्यादींचा समावेश झालेला आहे. मराठीच्या जोडीने काही प्रमाणात इंग्रजी लेखनाचाही समावेश करण्यात आलेला आहे. सभासदांकडून पत्राने वा फोनने वेळोवेळी प्रतिक्रिया प्राप्त होत असतात.

नोकरीतील अनुभव व प्रवास वर्णने बरेच सभासद लिहून पाठवितात. परंतु त्यांत तोचतोचपणा येत आहे व नोकरीतील अनुभव ही सारखेच आहेत, त्यांत काहीतरी नाविन्य असले पाहिजे. तसेच भाषाही शक्यतो ओघवती असावी, वाचकांना ती आवडली पाहिजे. प्रसंगात, अनुभवात वा प्रवास वर्णनात नाविन्य असले तर संपादक मंडळ प्रसिद्धीकरिता त्याची अवश्य दखल घेते. तरी सर्व सभासदांना विनंती की त्यांनी आपले लेखन 'संवाद'कडे आखलेल्या नियमानुसार पाठवावे ही विनंती.

दरवर्षी प्रमाणे याही वर्षी 'संवाद' लेख स्पर्धा २००७ आम्ही जाहीर करीत आहोत. स्पर्धेचा सविस्तर तपशील याच अंकात इतरत्र दिला आहे. पुनश्च नव वर्षाच्या सर्वांना शुभेच्छा !

**- वसंत धुपकर**

**On Federation Front**

### Arbitrary and Irrational Circular of Govt. and our Demand for Justice

It has been advised by our Federation President Shri.B.G.Dandekar vide his letter No.81 of 2006/07 dated 7th January 2007 that in response to our Federation Letter No.52 of 31-07-2006 the Bank has not advised us the steps taken by them to redress the injustice done to the retirees for the period from 1-11-97(Award Staff)/1-4-98 (Officers) to 31-10-2002 & 1-11-2002 to 31-10-2005. We are appending the excerpts of the Federation Letter No.81 of 7-1-07 conveying what steps have been taken by them in the matter, for information of the members.

"The above issue was discussed in the Annual General Meeting of the Federation on 7th October 2006 at Indore when it was unanimously decided to proceed further and file a writ at the appropriate time. Accordingly, we waited upto end of November 2006, expecting that the pension of those retirees who retired in the salary scales wherein D.A. upto 1684 points was merged, will be revised on the basis of the actual pay drawn by them at the time of retirement. However, now we feel that we have waited enough and we should start legal process."

In view of the above, Federation has directed our Advocate to proceed further. Accordingly, our Advocate has served a notice on the Bank on 8-12-2006 calling upon the Bank to immediately initiate corrective measures to make the extension of the benefit sought to be granted by the impugned Circular (under reference) applicable to all existing pensioners irrespective of their date of retirement.The draft plaint is under preparation. After approval of the draft of the Plaint by the Core Committee of the Federation the case will be filed at the earliest. We will keep the members advised of the further developments, if any, in the matter.

- Secretary

**e-mail : sbipenmumbai@yahoo.com**

## स्टेट बँक ऑफ इंडिया पेन्शनर्स असोसिएशन (मुंबई सर्कल), पुणे
## मुंबई झोनल सब सेंटर

द्वारा-श्री. एस.बी. गोखले
१९,'जयश्री', आर.एन्. नारकर मार्ग
घाटकोपर (पूर्व), मुंबई-४०००७७
दिनांक : २० जाने. २००७

### -नोटीस-

९ जानेवारी २००७ रोजी झालेल्या मुंबई सब-सेंटरच्या कार्यकारी मंडळाच्या सभेत मंजूर झालेल्या ठरावानुसार मुंबई झोनल सब-सेंटरची २० वी वार्षिक सर्वसाधारण सभा बुधवार दि. २१ फेब्रुवारी २००७ रोजी दुपारी १२.०० वाजतां 'श्री शिवाजी मंदिर (नाट्यगृह), प्लाझा थिएटर समोर, न.चिं. केळकर मार्ग, दादर (पश्चिम), मुंबई-२८ येथे संपन्न होणार आहे. तरी सर्व सभासदांनी या सभेस उपस्थित रहावे ही नम्र विनंती. सभेत खालील कामकाज होईल.

### कार्यक्रम-पत्रिका

१) दि. ७ मार्च २००६ नंतर आपल्या कार्यालयास ज्या मृत सभासदांची नांवे कळविलेली आहेत अशा सर्व मृत सभासदांना श्रद्धांजली वाहणे. (सर्व सभासदांना विनंती आहे की, ज्या मृत सभासदांची नांवे सभेच्या दिवशी वाचल्या जाणाऱ्यास यादीत समाविष्ट नाहीत अशा मृत सभासदांची नांवे, त्यांच्या मृत्यु-दिनांकासह, आपल्या मुंबई कार्यालयास कळवावीत ही विनंती.)

२) दि. ७ मार्च २००६ रोजी संपन्न झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेचा वृत्तांत वाचून मंजूर करणे. (हा अहवाल डिसेंबर २००६च्या 'संवाद' मध्ये छापला आहे.)

३) दि. ८-०३-०६ ते २१-०२-०७ या कालावधित ज्या सभासदांच्या वयाची ७५ वर्षे पूर्ण झाली आहेत अशा ज्येष्ठ सभासदांचा सत्कार करणे.

४) २००६ सालच्या वार्षिक अहवालास मंजुरी देणे. (अहवाल सोबत जोडला आहे)

५) असोसिएशनच्या निवृत्तीवेतनवाढी संदर्भातील सद्यस्थितीसंबंधी माहिती देणे.

६) माननीय प्रमुख पाहुण्यांचे भाषण

७) माननीय अध्यक्षांचे भाषण

८) अध्यक्षांचे परवानगीने आयत्या वेळच्या विषयांवर चर्चा.

**एस्.बी.गोखले**
सेक्रेटरी

**टीप :** १) कृपया सभेस येतांना जाने. २००७ चा 'संवाद' चा अंक (For Security purpose) आणावा.
२) या वार्षिक सभेला येण्याविषयी आपल्या सर्व सभासद बंधू/भगिनींना कळवावे.
३) आपली वार्षिक सर्वसाधारण सभा संपल्यावर त्याच दिवशी त्याच ठिकाणी दुपारी ३.३० वाजता बँकेची 'पेन्शनर्स-सभा' (Pensioners' Meet) होईल. त्यास सर्वांनी हजर रहावे ही विनंती.
४) अल्पोपहार मिळण्याची सोय सभास्थानी तिसऱ्या मजल्यावर केली आहे.
५) सभास्थानी पहिल्या तीन रांगा विशेष अतिथिंसाठी राखून ठेवल्या आहेत याची कृपया नोंद घ्यावी.

**लेखक - शरद्चंद्र चौधरी**
मूल्य : रू.६५/- +ट.ख.रू.१०/- तीन वा अधिक प्रतींच्या ऑर्डरसाठी टपाल खर्च माफ.

**ज्येष्ठ नागरिक डायरी - २००७**
''डायरी ? छे ! ही तर मैत्रीणच'' - डॉ.श्रीकांत पूर्णपात्रे
(माजी अध्यक्ष, इंडियन मेडिकल असोसिएशन, महाराष्ट्र)

**संपर्क :** (०२५३)२४१४५१४
**विहंगम प्रकाशन**
३८, 'रेणुका', अयोध्यानगर, उपनगर, नाशिक - ४२२००६

# State Bank Of India Pensioners' Association Mumbai Circle, (Pune) Mumbai Zonal Sub-centre

Shri.S.B.Gokhale
Secretary
19,"Jayashri"
R N Narkar Marg
Ghatkopar (E), Mumbai 400 077
Tel. No. 25134493

Office Address :
A/5, Swami Siddharth Society,
S. V. Road, Naupada,
Thane-400602
Tel No.:25446837

Dt. 20th January 2007

## NOTICE

The Managing Committee of the Mumbai Sub-Centre at its meeting held on the 9th January, 2007 has decided to hold the 20th Annual General Meeting of our Association's Mumbai Zonal Sub-Centre on Wednesday the 21st February 2007 at 12.00 noon at the following address:-

**Shri Shivaji Mandir (Natya Gruha)**
**Opp. Plaza Theatre, N. C. Kelkar Path, Dadar (W) Mumbai 400 028.**

## AGENDA

1) To condole the deaths of Bank's Pensioners/Family Pensioners/Associate Members whose names have been reported to us after 7th March 2006. Members are requested to advise us the names and dates of members, if any, if not included in the list to be read at the time of AGM.
2) To confirm the minutes of the last Annual General Meeting held on 7th March, 2006 (Minutes published in December 2006 issue of Samvad)
3) To honour senior members who have completed / will complete 75 years age between 8th March 2006 and 21st February 2007 (both days inclusive).
4) Committee's Report for the year 2006 to be read, discussed and adopted (A copy of the report is enclosed)
5) To discuss recent developments
6) Speech of the Chief Guest.
7) Speech of the President.
8) Any other business with the permission of the Chair.

By order of the Managing Committee
S. B. Gokhale
Hon. Secretary

Encl.: Report

i) Please bring a copy of "Samvad" issue for January 2007 along with you for security purpose.
ii) Please inform other members, known to you, about this meeting.
iii) The meeting of the Bank's Pensioners arranged by the Bank on the 21st February 2007 will start at 3.30 p.m. at the same venue after our meeting is over by 2.30 p.m.

**Important :**
As per our practice, a memorandum covering all the problems will be submitted to the management well in advance to enable them to study and reply in Bank's Meeting. Pensioners are therefore, requested to furnish their problems to us in writing so as to reach say before 12/02/2007, so that a consolidated memorandum will be put up to the Bank Management to avoid direct questions/ discussion with the management representatives in the meeting. This is to adhere to the time schedule.

iv) Snacks will be served on the 3rd Floor of the building as usual.

v) All seats in A to C rows are reserved for special invitees. Members are requested to please occupy other seats.

* * * * * * * * * * * * * * * * *

## Report of the Managing Committee of the Mumbai Zonal Sub-centre for the year - 2006

The last Annual General Meeting of our Circle Association was held at Pune on the 25th July 2006.

**1. Managing Committee Meetings:**

During 2006 Four Committee Meetings were held which were well attended.

**2. Condolences:** We regret to advise the deaths of the members whose names have been/will be published in various 'Samvad' issues, however all the names will be read at the time of AGM. May the souls of the departed members rest in peace. We extend our heartfelt condolences to the bereaved families.

**3. Membership and Finance:** During 2006, 487 new members were enrolled as against 203 new members in 2005 as under :

| | | |
|---|---|---|
| Patron Members | : | 242 |
| Associate Patron Members | : | 209 |
| Benefactor Members | : | 02 |
| Associate Benefactor Members | : | 04 |
| Family Patron Members | : | 18 |
| Family Benefactor Members | : | 12 |
| Total New Members Enrolled During 2006 | : | 487 |

Out of 487 New Members the break up of old retirees and who retired during 2006 is as under :-

| | |
|---|---|
| Old Pensioners/Associate/Family Pensioners | 103 |
| New Pensioners/Associate/Family Pensioners | 384 |
| Total - | 487 |

Some of the existing Pensioners/Associate Members/Family Pensioners have become patron member by paying difference in the membership fee. We request our pensioners, family pensioners and associate members who are yet to become patron member to do so by paying the difference.

A sum of Rs.7,20,806/- has been collected during the year under report as against Rs.4,54,018/- during 2005. Shri D.R.Tirodkar since 1993 has enrolled 1849 new members and collected Rs.20,34,020/-. A grand performance indeed !!

The breakup of collection is as under:-

| | |
|---|---|
| Admission & Membership Fee & Conversion to Patron Member | Rs. 4,84,020/- |
| Donations received .. .. .. .. .. .. .. .. .. | Rs. 2,36,786/- |

We are glad to state that several members have given donations for various reasons viz. Excellent work done by the Association; Daughter's/Son's marriage; 70th and 75th Birthday Ceremony; In memory of beloved family members etc.

In this connection it is necessary to make a special mention of the following donations.

| Name of Donor | Amount | Name of Donor | Amount |
|---|---|---|---|
| Shri M. P. Khambete | Rs. 15,000/- | Shri V.M.Prabhudesai | Rs. 10,001/- |
| A well wisher | Rs. 5,800/- | Shri Sanjay Powar (in memory of late Shri M. M. Joglekar) | Rs. 5,101/- |
| Shri H. M. Mistry | Rs. 5,101/- | Shri J. R. Kothare | Rs. 5,000/- |
| Shri U. D. Kothare | Rs. 5,000/- | Shri K. R. Karve | Rs. 5,000/- |
| Shri V. S. Bapat | Rs. 5,000/- | Shri N. E. Wadia | Rs. 5,000/- |

Some of the members have also donated to Distress Relief Fund, Legal Fund, Samvad etc. We are grateful to all the donors.

The Association has purchased a flat of about 600 sq. ft carpet area and converted it into Association's Office, including Furniture, fittings, paintings etc. Total cost is Rs. 18 lakhs. We request Mumbai sub-centre members to kindly donate towards Building fund. We have already collected a sum of Rs. 82,254/- so far. We have to replenish the cost of flat to the extent of Rs. 10 lacs to Head Quarters hence the request for donation towards Building fund.

**4. Local Meeting:** During the year 2006, one meeting of the Pensioners was held at Panvel on 8/2/2006. The meeting was arranged by Shri M.K. Gohil, Chief Manager of the Branch. The present progress about revision of Pension/Family Pension etc. was explained to the Pensioners. A session of questions & answers was also arranged.

**5. Court Case:** You are aware that we have supported a case filed by some pensioners in the High Court, New Delhi against Govt. of India/Reserve Bank of India/State Bank of India. The case is now in Senior Citizens' Court and is listed at No. 11.

**6. Indefinite strike by the staff :**

As you are aware that the State Bank employees from all the cadres went on indefinite strike from the 3rd April 2006 demanding to resolve following issues:-

1) The pension ceiling needs a comprehensive review to provide for 50% of the last pay drawn
2) Commutation on par with the industry level
3) Index Linked D.A. as available in the industry
4) Family Pension as available in the industry

The strike in question was called off on Sunday the 9th April 2006 after concerned parties arrived at an understanding for revision of Pension to those who retired after 31st October 2002. Please refer to the post strike analysis done by Shri V. K. Mehrotra Dy. Mg. Director (Retd.) published in June 2006 issue of 'Samvad'. "Revision of Pension - where we stand" analysis was

done by Shri R. N. Banerjee, General Secretary, Bengal Circle Pensioners' Association and it was published in December 2006 issue of 'Samvad'.

**7. IBI Employees Provident Fund - Disposal of balances lying in "Forefeiture A/c"**

After discussions with the Federation of SBI Pensioners' Associations the Trustees of the IBI Provident Fund have decided that the funds lying in IBI employees Provident Fund "Forefeiture A/c." be utilized for the benefit of Ex-employees/ Pensioners/Family Pensioners of Imperial Bank of India. Accordingly the Bank has approved the scheme under which cost of medical expenses will be reimbursed to the extent of Rs. 5,000/- (Rs. Five thousand only) per beneficiary per year on the basis of claim certificate till the entire fund is exhausted. Our Mg. Committee members took lot of initiatives and many Pensioners/Family Pensioners of IBI received Rs. 5,000/-. The members willingly donated for the good work done by the Association. A list of such donors was published in October 2006 issue of 'Samvad' and will be published in subsequent issues of 'Samvad'. We are thankful to all the donors.

We request the members who have benefited from this scheme to generously donate to the Association.

**8. Family Pension Scheme : Revision in mode of computation of Dearness Relief :**

The Dearness Relief was paid to family pensioners as per the formula applicable to Family Pensioners of the Government of India. This formula was based on the recommendations of the 4th Pay Commission's Report.

The President of Federation of SBI Pensioners' Associations was pursuing the issue for payment of Dearness Relief to Family Pensioners in line with the payment of D. R. to pensioners of the Bank. Finally our suggestion was approved and revised Dearness Relief to all Family Pensioners was made effective from 1-5-2005. The arrears were also paid to Family Pensioners. The increase in Dearness Relief is from Rs. 33/- to Rs. 129/- p.m.

**9. On Federation Front :**

You are aware that the Federation's Administrative Office was shifted to Mumbai Circle and it has started functioning from December 2005.

On the 29th December 2005 our President had discussions with Shri Shantha Raju, then General Secretary of Supervising Staff Federation on our pending issues.

Our President Shri B. G. Dandekar wrote 4 letters dated 9-5-06 to the Dy. Managing Director on the following issues :-

| | | |
|---|---|---|
| 1) | Pension Issue - | Retirees between 1-11-97 to 31-10-2002 (salary scales 1684 points DA Merger) |
| 2) | Dearness Relief - | from 1-5-2005 D.R. @ 0.18% per slab(Principal of 100% neutralisation of D.R. should be extended to the past retirees.) |
| 3) | Family Pension - | Since inception (1986) the family pension scheme has not been revised. |

4) Problems faced by the retirees during 1-11-87 and 31-10-93. The pension at the rate of 32% and above is being paid to several officers even now. The Pension should be 50% of their pay to all retirees.

As the post strike position was not clear, it was decided to call for a meeting of the Governing Body of the Federation on 13th May 2006 at STC Bandra (Mumbai). The gist of the discussions in the meeting was published in 'Samvad' issue of May 2006.

In spite of strike we could not achieve the desired results. The President Shri B. G. Dandekar felt that now our grievances can be redressed only through court cases and accordingly it was decided to file writ petitions in different High Courts on different issues.

Our Federation has submitted a memorandum dated 6-7-2006 to State Bank of India for placing the same before the newly constituted committee by the Govt. of India. The gist of the memorandum was published in 'Samvad' issue of October 2006.

Two letters (i) Ref. No. 52 dated 31-7-2006 Re: Arbitary and irrational circular of Government of India and our demand for justice & (ii) Letter No. 60 of 30-9-2006 Re: Discrimination in the grant of dearness relief on pension. Both the letters were published in 'Samvad' issue of October 2006.

The meeting of the Office Bearers of three Federations was held at Bangalore on 15-08-2006. The main participants were Sarvashri G. D. Nadaf, Shantha Raju & K. P. Deb of AISBOF, P. K. Patnaik of AISBISF, and B.G.Dandekar, V. K. Mehrotra, R. N. Godbole, S. B. Gokhale & G. K. Gandhi of FOSBIPA and also Sarvashri R. Nagarajan, PPS Murthy and Dharma Rajan of Chennai Circle Pensioners' Association.

Shri P. K. Patnaik, General Secretary of AISBISF presided over the Meeting. In the meeting it was clear from the discussions that there was no MOU as reported by 2 Federations but there was only an understanding. They have not considered revision of pension in respect of old retirees as well as Family Pension Scheme.

Governing Body Meeting of our Federation was held on 6th October 2006 and A.G.M. was held on 7th October 2006 at Staff Learning Centre, Indore. We have reviewed all the Pending issues and lobbying through M.Ps. for Pension Issue was considered.

Accordingly a Memorandum pointing out injustice meted out to SBI Pensioners/Family Pensioners has been handed over to Hon'ble Shri P.Chidambaram, Finance Minister, Government of India, New Delhi. In this regard Shri E. K. Thakur, MP (Rajyasabha), took initiative and obtained signatures of 75 MPs and handed over the memorandum to the Finance Minister.

**10. <u>Pension</u> :** The Government of India has approved the revised Pension to employees/officers who retired after 31st October 2002 wherein DA upto 2288 points (1960-100) has been merged. The revised Pension is payable only from 1-5-2005. The revised Pension and arrears are likely to be paid before 31st March 2007. (Kindly peruse August 2006 issue of 'Samvad').

**11. <u>Other Meetings</u> :**

1. Shri S.B. Gokhale, General Secretary of our Federation attended the Pensioners Meeting at Satara on 29-1-2006.
2. S/Shri B.G. Dandekar, President of Federation, V.M. Gokhale, President Mumbai Circle and S.B. Gokhale, General Secretary attended Pensioners meet at Akola on 11-2-2006 and also at Nagpur on 12-2-2006.
3. Silver Jubilee function of Bengal Circle Pensioners' Association held at Kolkatta on 26-2-2006 was attended by S/Shri B.G. Dandekar, V.M. Gokhale, S.B. Gokhale and B.P. Khare, from Mumbai.
4. Federation's Governing Body Meeting at STC Bandra held on 13-5-2006 was attended by S/Shri B.G. Dandekar, V.M. Gokhale, S.B. Gokhale & B.P. Khare.
5. S/Shri B.G. Dandekar and S.B. Gokhale attended Pensioners Meet at Palakkad (Palghat), Kerala on 18th June 2006.

6. S/Shri B.G. Dandekar and S.B. Gokhale attended Tripartite meeting of Federations held at Bangalore on 15-8-2006.
7. S/Shri B.G. Dandekar, V.M. Gokhale, S.B. Gokhale and B.P. Khare attended Governing Body and AGM of Federation held on 6th & 7th October 2006 respectively at Staff Learning Centre, Indore.

We thank Corporate Centre Executives, Staff of P.P.G.Dept. at Corporate Centre and Mumbai LHO for their co-operation in solving our problems. We thank Shri A.C. Varma, Dy Mg. Director, Shri Y.S.S.Kapdi, Chief General Manager (Per & HRD), Shri Rajeev Lal, Dy. G.M. (IR), Shri A.K. Palit, Dy. General Manager (HRD), Shri S.B. Lal, Chief Manager (Personnel), all from Corporate Centre with whom we had discussions regarding several problems. We thank Smt. H. Machado, General Manager (P.R.O. Dept.) Corporate Centre, for extending Co-operation to our Association.

Further, we thank Mumbai Circle Authorities, specially Shri A.Ramesh Kumar, C.G.M. Shri Diwakar Gupta C.G.M., Shri Sangeet Shukla C.G.M., N. Raja C.G.M., Shri H.Rao (G.M.), Shri Sharad Shukla (G.M.) and Smt. Gitanjali Mishra and Shri Ajaykumar Kaul Dy. G.M. & CDO, Shri A.G. Herlekar, A.G.M. (Personal & HRD), Officers from Staff Welfare Cell at Mumbai LHO, Shri Moin Qazi (PRO), Mumbai LHO, Shri S.K. Devrukhkar, AGM, PPG Deptt. and Staff members from PPG Deptt., Mumbai LHO.

Further, we also thank Shri S.S. Purohit, Dy. G.M., Shri B. Shriram, Dy. G.M., Shri C. Gangadharan Dy. G.M. & Shri V.C. Bajpai, Dy. G.M. of Mumbai Zonal Office, Mrs. Shailaja Gharat Per & HRD and Shri P.S. Nair, Shri V.Vishwanathan, all from Personnel & HRD Cell, Dr. Ramesh Nair, Sr.Medical Officer, Zonal Office, Mumbai for extending excellent co-operation to our Association.

In this connection we can not forget the co-operation extended to us by Late Shri Y. P.Bedekar. May his soul rest in peace.

We thank S/Shri V.R. Kuddyady, V.M. Prabhudesai, D.R. Tirodkar, G.R. Kashelikar & K.A. Burde and many others who, though not on the Committee, are helping the Association in many ways.

By Order of the Managing Committee
S. B. Gokhale
Hon.Secretary

**********************************************

## स्टेट बँक पेन्शनर्स सांस्कृतिक मंडळ, ठाणे-मुलुंड

## ✻ विनामूल्य वैद्यकीय तपासणी शिबीर ✻

मंडळातर्फे व बँकेच्या नौपाडा शाखेच्या सहकार्याने ठाणे-मुलुंड परिसरातील स्टेट बँकेच्या सर्व पेन्शनरांसाठी एक **विनामूल्य वैद्यकीय तपासणी शिबीर** रविवार दिनांक ११ फेब्रुवारी २००७ रोजी आयोजित करण्यात आले आहे. स्थळ व वेळ खालीलप्रमाणे -

**शिबीर स्थळ :** स्टेट बँक ऑफ इंडिया, नौपाडा शाखा, वेळ : सकाळी ९ ते दुपारी २ वाजेपर्यंत.

शिबीरामध्ये हाडांमधील कॅल्शियम व इतर खनिजांचे प्रमाण मोजून व त्यानुसार वैद्यकीय सल्ला दिला जाईल. साधारणपणे ८० लोकांचीच तपासणी होऊ शकत असल्याने, 'प्रथम येणाऱ्यास प्राधान्य' दिले जाईल याची कृपया नोंद घ्यावी ही विनंती.

- शरद गडकरी, सचिव

**विशेष सूचना -** कृपया सर्वांनी २००७ सालासाठीची मंडळाची वार्षिक वर्गणी रू. १००/- शिबीर स्थानी द्यावी ही विनंती.

## आठवण - कादंबरीकार प्रा. ना. सी. फडके काही आठवणी

ते मला वाटतं, १९५३-५४ साल असावं, १९५१ साली एस्. एस्. सी. झाल्यावर मी नोकरीच्या शोधात होतो. माझा एक वर्गमित्र, त्यावेळी श्री. ना. सी. फडके यांचा लेखनिक म्हणून त्यांच्याकडे नोकरी करायचा. त्याची आणि माझी अधून मधून गाठ पडायची. माझ्या सुदैवाने आणि त्याच्या नशिबाने त्याला रेल्वेत नोकरी लागली. माझं मराठी आणि इंग्रजी हस्ताक्षर तसं बरं होतं. त्याने माझी शिफारस, त्याच्या जागी ना. सी. फडके यांचेकडे केली आणि माझी वर्णी लागली. सकाळी ९.३० ते ११.३० आणि संध्याकाळी ४.३० ते ६.३० अशी नोकरीची वेळ पगार रू. ६०/-

श्री. ना. सी. फडके यांना सगळेजण 'आप्पासाहेब' असं म्हणायचे. आम्ही जवळचे लोक 'आप्पा' या नावानं त्यांना हाक मारीत असू. कथालेखक सौ. कमलताई फडके या आप्पांच्या सौभाग्यवती ! थोर कवयित्री इंदिराताई संत यांची कमल दीक्षित ही धाकटी बहीण. आप्पा त्यावेळी कोल्हापूरच्या राजाराम कॉलेजात प्राध्यापक म्हणून होते. कमल दीक्षित ही त्यांची विद्यार्थिनी ! पुढे आप्पांचा प्रेमविवाह त्यांच्याशी झाला.

श्री. वि. स. खांडेकर आणि ना.सी. फडके हे त्या काळातले मराठीतले थोर कथा-कादंबरीकार म्हणून गाजलेले होते. वि. स. खांडेकरांचं लेखनतंत्र-कौशल्य वेगळं तर ना. सी. फडके यांची लेखन-पद्धती वेगळी ! आप्पा हे विद्यार्थ्यांचे लाडके प्राध्यापक होते, तरुण-तरुणींत ते फारच लोकप्रिय ! त्यांच्या कादंबऱ्यांनी त्यावेळी तरुणांना वेडं केलं ! दौलत, अटकेपार, कुलाब्याची दांडी, जादूगार वगैरे त्यांच्या कादंबऱ्यांवर लोक अक्षरक्ष: तुटून पडायचे ! 'प्रेम' हे कादंबरीचं मुख्य सूत्र असायचं. आप्पांनी शेकडो कथा आणि अनेक कादंबऱ्या लिहिल्या आणि त्या सर्व लोकांना आवडल्या. साहित्याच्या अनेक क्षेत्रांत त्यांनी भरारी मारली आणि लोकप्रियता मिळविली. मला वाटतं 'लेखनकला-मंत्र आणि तंत्र' हे त्यांचं पुस्तक देखील खूप गाजलं. मराठी आणि इंग्रजी या दोन्ही भाषांवर त्यांचं प्रभुत्व होतं. ते जसे यशस्वी लेखक होते तसेचे फर्डे वक्तेही होते ! त्यांच्या सभांना नेहमीच गर्दी व्हायची.

आप्पा यावेळी भांडारकर रोडला भालेराव इंजिनीअर यांच्या बंगल्यात खाली भाड्याने रहायचे. बंगल्याच्या पोर्चमध्ये टेबल-खुर्ची टाकून मी लिहायला बसायचो. तिथं एक चौपदरी असा लाकडाचा कड्यांचा झोपाळा होता. आप्पा तिथं बसत, हळुहळू झोका घेत आणि मला 'डिक्टेट' करीत. कादंबरीचं कच्चं टाचण आणि त्याचा आराखडा त्यांचेकडे तयार असे आणि त्यानुसार ते कादंबरीच लिखाण मला सांगत. त्यांची 'इशारा' ही कादंबरी मी लिहिली. पहिल्याच दिवशी या कादंबरीचा जेवढा भाग लिहून झाला होता तो मला वाचायला दिला-संदर्भ लागावा म्हणून !

त्यांना स्फूर्ति आली म्हणजेच ते सांगायचे असं नाही. ते नेहमी मजकूर सांगायला तयार असत. त्यांना आपोआप सुचत जायचं आणि ते मला सांगायचे. दिवसाचं लिहून झाल्यावर संध्याकाळी मी लिहून घेतलंलं तपासयाचे. काही चुका झाल्या असल्यास त्या सुधारायचे किंवा त्यांना नवीन काही सुचलं तर लिहायला सांगायचे ! मोठं मराठी अक्षर काढतोस ! जरा लहान काढावं ! मग मी थोडं लहान अक्षर काढायला लागलो.

आप्पा हे स्वभावानं फार निर्भीड होते. प्रसिद्ध झालेला आणि त्यांच्या वाचनांत आलेला एखाद-दुसऱ्या लेखकाचा लेख त्यांना आवडला नाही तर त्यावर ते टीका करीत. त्यामुळेच फडके-अत्रे वाद किंवा फडके-भावे वाद त्याकाळी फार गाजले ! परंतु याउलट त्यांना एखादं लिखाण आवडलं तर ते लेखकाला शाबासकी देखील देत. नवीन लेखकांना प्रोत्साहित करीत. आप्पा हे एक रसिक गृहस्थ होते. पान खायला त्यांना आवडायचं. कधीकधी ते धूम्रपानही करायचे. गायन-वादनाची जशी त्यांना आवड होती. तशीच क्रिकेटचीही ! नाटक-सिनेमा ते पाह्यचे ! जेवणाबाबतही ते चोखंदल आणि खवय्ये होते.

त्यांना खूप लोक भेटायला यायचे. आप्पा सगळ्यांचे स्वागत करायचे, त्यांच्याशी बोलायचे पण आपला मान राखून ! त्यांचे अत्रे-भावे यांच्याशी वाद झाले. तरी प्रत्यक्षात त्यांची कधी भेट झाली तर हे मोठेमोठे नावाजलेले साहित्यिक एकमेकांचा आदरच करायचे ! आमच्या बाबतीत ते फार सहृदय होते. येवढे मोठे असूनदेखील आम्हाला मदत करायला ते नेहमीच तयार असायचे ! त्यांच्या घरांतलं वातावरणही आनंदी असायचं ! मला आठवतंय. आप्पांची एकसष्ठी होती. दिवसभर खूप लोक त्यांचं अमीष्टचिंतन करायला आले होते. परंतु सर्वांत प्रथम, सकाळींच प्रसिद्ध कथालेखक श्री. अरविंद गोखले, एकसष्ठ टपोऱ्या ताज्या, टवटवीत गुलाबाच्या फुलांचा हार घेऊन आले होते. त्यांनी तो हार आप्पासाहेबांच्या गळ्यात घातला आणि त्यांचं अभीष्ट-चिंतन केलं. आप्पांनादेखील आनंद वाटला.

पुढे आप्पांनी विजयानगर कॉलनीत स्वत:चा बंगला बांधला. त्यांची 'दौलत' ही कादंबरी खूप गाजली होती. तेच नाव त्यांनी बंगल्याला दिलं. अधून-मधून मी त्यांना बँकेत नोकरी लागल्यावरदेखील भेटत असे. एका थोर साहित्यिकाच्या सहवासात, त्याच्या हाताखाली, थोडा काळ कां होईना, मला त्यांचा लेखनिक म्हणून काम करायला मिळालं याचा मला आनंद आणि अभिमान वाटतो.

**रत्नाकर देशमुख,**
'विक्रांत' सोसायटी, पुणे

असोसिएशनच्या कार्यास शुभेच्छा – पृष्ठ प्रायोजन : एक हितचिंतक, अकोला




रेखाचित्र - प्रभाकर गुपचूप

बऱ्याच दिवसांनी चिंतामणी ओंकार साठे यांच्या पत्रपेटीत एक पत्र पडले. ते टिळकरोड शाखेत पेन्शन घेण्यासाठी तसेच हयातीचा दाखला देण्यासाठी नुकतेच बाहेर पडले होते. त्यांच्या सौभाग्यवतीने पाकीट उघडले. बँकेच्या पेन्शनर्स असोसिएशनकडून आलेले ते पत्र त्यांनी वाचले. श्री.चिंतामणी साठे यांना पंचाहत्तर वर्षे पूर्ण झाली होती त्या निमित्त वार्षिक सर्व साधारण सभेमध्ये त्यांचा सत्कार होणार असल्यामुळे त्यांचा 'बायोडाटा' पाठवण्याविषयी त्यात लिहिले होते.

श्री.साठे घरी परतल्यावर त्यांच्या सौभाग्यवतीने ही आनंदाची बातमी त्यांचे कानावर (मोठ्या आवाजात) घातली व ताबडतोब 'बायोडाटा' लिहून पाठवा असे फर्माविले.

''अग ! अशी घाई कां करतेस ? तुला माहीत आहे ना आताशा मला नीट दिसत नाही, ऐकायला कमी येतं आणि हातही थरथरतो ते ! मग असं कर ना तुला माझी संपूर्ण माहिती आहे. मग तूच लिही ना माझा 'बायोडाटा' आणि दे पाठवून.'' मिसेस साठ्यांचा नाईलाज झाला. त्यांनी साठे यांचा सविस्तर 'बायोडाटा' पुढीलप्रमाणे लिहून पाठविला -

''जवळ जवळ ३५ वर्षे यांनी बँकेची सेवा केली. बदली नको म्हणून प्रमोशन घेतले नाही. सेवानिवृत्त होताना त्यांना 'NPA' म्हणून संबोधले गेले. अनेक वर्षे बँकेत काम केल्यामुळे प्रत्येकाकडे संशयाने पाहण्याची सवय. एका कानात श्रवण यंत्र. परंतु पुढे मनुष्य दिसला की, 'त्या पलीकडच्या खिडकीवर जा' किंवा 'आत साहेबांना भेटा' अशी त्यांची कस्टमर सर्व्हिस. बोलण्यात आपलेपणा नाही. बाहेर 'विनामूल्य प्रवेश' असा बोर्ड दिसला की कथा, कीर्तन, गायन, वादन, भोजन, सिनेमा, नाटक, तमाशा, चर्चा याला जाण्याची आवड. तसेच नातलगांच्या व मित्र परिवारांच्या लग्न पत्रिकेत 'आहेर अथवा पुष्पगुच्छ आणू नये' अशी टीप असेल तर कार्यालयात सकाळी नाष्ट्यापासून उपस्थिती लावतात. वशिल्याने Inward Clerk म्हणून लागले आणि ३५ वर्षांचे सेवेनंतर Outward Clerk म्हणून निवृत्ती घेतली. गावाबाहेर बदली होईल म्हणून प्रथम प्रथम बढती घेतली नाही आणि पुढे बढती मिळाली नाही म्हणून वृद्ध आई वडिलांकडे शुश्रूषा करण्यास माझेशिवाय दुसरे कोणी नाही या सबबीखाली खुर्ची सोडली नाही. फक्त Outward चे 'रेकॉर्ड रूम' झाले. रविवार व सरकारी सुट्टीला जोडून बँकेला न सांगता कॅज्युअल लिव्ह घेण्याचा पायंडा यांनीच पाडला. ईयर एण्ड व इन्स्पेक्शन आल्यावर प्रिव्हिलेज लीव्ह म्हणजे हक्काची रजा ते कधी सोडत नव्हते. वैद्यकीय सेवेच्या बिलास कोणतीच आडकाठी नसल्यामुळे मेडिकल अधिक L.F.C. किंवा L.F.C. झाल्यावर मेडिकल अशी रजा. अधून मधून बँकेच्या खर्चाने ट्रेनिंग. त्यात T.A. अधिक D.A. जेवणखाण, राहण्याची सोय व ट्रेनिंग सेंटर जवळील प्रेक्षणीय स्थळांना भेटी यामुळे भारत दर्शन घडले. शेवटपर्यंत तब्येत ठणठणीत, हल्ली फक्त काही वेळेस झोपेत C.G.M., G.M., D.G.M., A.G.M., R.M., B.M. असे बडबडतात. परंतु वयोमानाप्रमाणे 'रामनाम' किंवा 'हरिनाम' घेता येत नसेल म्हणून मी तिकडे दुर्लक्ष करते. बँकेने बळे बळे जर क्लिअरिंगला पाठविले असेल तर 'मी आज लाखो रूपये घेऊन गेलो व लाखो रूपये घेऊन आलो' म्हणून अभिमानाने सांगण्याची सवय. महत्त्वाची एकही गोष्ट जागेवर मिळत नाही. हे झाले दारचे. घरचे म्हणाल तर सोसायटीतील सर्वांशी सरळ नाही. पाळीव प्राणी, पायवाट, पाणी, पॅसेज, पार्किंग, परवानगीशिवाय बांधकाम, पदाचा गैरवापर, पाण्याचा पंप अशा अनेक कारणांवरून वाद-विवाद; मग सगळ्यांचे नावाने घरात शंखनाद. यांना आध्यात्मात रस नाही. राजकारणात गंध नाही आणि पेन्शनर्स असोसिएशनचे कामाबद्दल कळकळ नाही. यामुळे सेवानिवृत्तीनंतर संन्यासी व्रत घेतल्यासारखे वाटतात. दैनंदिन कार्यक्रमात थोडा बदल करावा म्हणून माझे माहेरी पाठविले तर 'डेप्युटेशन' वर आल्यासारखे वागतात. माझेबरोबर उतारवयात 'जॉईंट फोटो' काढावा लागेल म्हणून अद्याप फॅमिली पेन्शन मंजूरी घेतलेली नाही व पेन्शन अकाऊंटमध्ये माझे नाव पण घातलेले नाही. 'संवाद' मासिक वेळेवर आले नाही तर असोसिएशनशी फोनवर वाद घालतात. पण येऊन पडलेला 'संवाद' संपूर्ण वाचतील याची खात्री नाही.

उतार वयातील व्याधी सोडल्या तर त्यांची तब्येत ठीक आहे. आज ना उद्या पेन्शन वाढ होणारच या आशेवर ते सुखाने कालक्रमण करीत आहेत. ८१ व्या वर्षी सहस्र चंद्रदर्शन प्रसंगीही असोसिएशनने असाच पेन्शनरांचा सत्कार करावा अशी त्यांची असोसिएशनकडे या शुभप्रसंगी मागणी आहे. मात्र कृतज्ञता म्हणून असोसिएशनला माझे पती काही देणगी देतील याची मला मुळीच खात्री नाही.''

माझे पतिराज चिंतामणी ओंकार साठे यांचा 'खराखुरा बायोडाटा' मी त्यांची सौभाग्यवती (सहधर्मचारिणी) या नात्याने माझ्या अधिकारात अगदी प्रामाणिकपणे लिहून पाठविला आहे. असोसएशनच्या कार्याला माझ्या हार्दिक शुभेच्छा !

**मधुकर पालकर,** पुणे

## ❇ अेकच थेंब

अेकच थेंब शब्दाविना
बरेच काही बोलून जातो
निरनिराळ्या रूपात जेव्हा
तुमच्या माझ्या समोर येतो

कष्टकरी कपाळावर
निढळाचा घर्मबिंदू
सुखी समाधानी डोळ्यात
आनंदाचा अश्रू

चित्तवेधक आकर्षक
असेही रूप घेतो
चित्ताकर्षक कोणी जेव्हा
मोती म्हणून दागिन्याचे रूप देतो

रूप त्याचे खरे परंतु
बिंदूचा जेव्हा दवबिंदू होतो
नाजूकशा स्पर्शाने
टवटवीत टपोऱ्या पाकळीवर
जेव्हा तो थरथरतो

**नी.व.ओढेकर** (नाशिक)

## ❇ अंतिम सत्याला सामोरे जाताना

अंतिम सत्याला सामोरे जाताना,
गर्भगळित होतात माणसे
नुसत्या कल्पनेनेच 'त्याच्या'
रडवेली होतात माणसे
या विश्वातील प्रत्येक वस्तू
चिरंतन नसतेच कधी
जन्मही घ्यावा लागतो इथे
अंतिम सत्याच्या आधी
फुलांनाही आयुष्य असते
क्षणांचे वा प्रहरांचे
ग्रह ताऱ्यांनाही आकर्षण असते
त्या कृष्ण विवरांचे
जे घडणारच आहे
त्याची भीती का बाळगावी ?
अंतिम सत्याला सामोरे जाताना
ओठी असावी त्याची ओवी

**- मधुकर सुळे**

सी६/१३/२ : ४ सेक्टर १८, नविन पनवेल ४१०२०६

## ❇ भाव माझ्या अंतरीचे

भाव माझ्या अंतरीचे रानीं सामावले
आज कसे मन माझे निसर्ग जहाले ...........
पक्ष्यांच्या बोलीत मी गात धुंद गाणी
दवांतुनी हळू ओघळते पहाटे विराणी
सतारीचे पर्वत कुक्षीं सूर उमटले.........
पानांच्या गवाक्षांतुनी किरण आशेचा
मोरपिसाऱ्यामधुनी फुलला फुलोरा मनाचा
प्रतीक्षेला यशाचे हे पुष्पगुच्छ आले..........
थरथर मनींची सामावुनी घे कोंवळी लव्हाळी
शहाऱ्यांचे तरंग घेऊनी सरिता खुळावली
मधुप सांगे फुलांस माझे गुपित मनामधले........

**सौ.उज्ज्वल र.ब्रम्हांडकर**

६१ सर भालचंद्र रोड, दादर, मुंबई १४

## प्रतिक्रिया

'संवाद' चे अंक नियमितपणे वेळेवर मिळतात. 'संवाद' च्या माध्यमातून सभासदांशी नियमित संवाद साधला जातो. आजकाल सभासद तर त्यावरच्या प्रतिक्रिया भेटल्याबरोबर व्यक्त करतात.

दिवाळी अंकातील 'जरा विसावू या वळणावर' हा लेख वाचणाऱ्यांना भूतकाळात घेऊन जातो. 'हात दाखवून अवलक्षण' राशिभविष्य उत्तम, दिवाळी अंकाचे मुखपृष्ठ उत्तम आहे. 'संवाद' ला खूप खूप शुभेच्छा.

**महेश्वर द. कोल्हरकर**, नागपूर

********

'संवाद' चा दिवाळी अंक उत्तम झाला आहे. सर्वच लेखकांचे लेख ओघवान वाटले. बँकेत आकडेमोड करणारी लेखणी, कसलेल्या लेखकांच्या लेखणीसारखी चालताना पाहून खरोखरीच सुखद आनंद मिळतो. 'संवाद' च्या रूपाने सहकारी मित्रांच्या सुप्त गुणांना पुनरउन्मिलित करून आपण स्फूर्ती देत आहात, याबद्दल 'संवाद' ला धन्यवाद व शुभेच्छा.

**प्रकाश पु.दुनाखे**, पुणे

# भटकंती

## दाजीपूर ते गगनबावडा थरारक अनुभव !

शनिवारचा अर्धा दिवस काम होते. सोमवारची जोडून सुट्टी होती. ९-१० जणांचा ग्रुप होता. संध्याकाळी ७ वाजण्याच्या सुमारास दाजीपूरला आलो. अंधार पडला होता. २३ कि. मी. अंतरावरील टॉवरकडे जावयाचे होते. हिमालयीन ट्रेकर्सने आमचा एक सदस्य मालनकर यावयाचा होता. त्याची तासभर वाट पाहून पुढे निघालो. बरेच अंतर पुढे गेलो. अंधाऱ्या घनदाट जंगलातून जात असताना एकांडा शिलेदार मालनकर मोठमोठ्याने आमच्या नावाने हाका मारत मिणमिणत्या बॅटरीच्या प्रकाशातून भराभर पावले टाकत येत होता. त्या शांत धीर गंभीर वातावरणात मालणकरच्या हाकेचा आवाज घुमत होता. सारेजण आश्चर्यचकित झाले. त्याची पाठ थोपटत एका सुरात म्हणालो, खरा शूर मावळा आहेस, हे येऱ्यागबाळ्याचे काम नाही. हा संपूर्णपणे चढाचा मार्ग पार करून टॉवरवरती यावयास रात्रीचे दोन वाजले. सर्वजण दमून गेलो होतो. तहानेने जीव व्याकुळ झाला होता. दाजीपूरच्या या जंगल भागात पाणी मिळणे दुरापास्त. टॉवर जवळील वाघाचे पाणी या झऱ्यामध्ये प्यावयास पाणी मिळाले.

त्या काळी वनविभागाची रात्रीच्या वेळी जंगलात यावयास आडकाठी नव्हती. मात्र आता अजिबात परवानगी नाही. उंच डोंगरावरील घोंघावणाऱ्या वाऱ्याच्या सान्निध्यातच पण टॉवरच्या एका आडोशाच्या बाजूला शेकोटी पेटवून स्वयंपाक केला. जेवण व चहा पाणी उरकेपर्यंत पहाट झाली. आमचा पहिला प्लॅन व्हाया टॉवर ते राधानगरी डॅम असा होता. पत्रकार मोहन हवालदार यांच्याकडून दिशादर्शक मॅप तयार करून घेतला होता. याच्या आधारे डॅमच्या दिशेने सकाळी ६ च्या दरम्यान निघालो. पण मार्ग चुकलो, पुढे जाता येईना की मागे फिरता येईना. पूर्णपणे फसगत झाली. डॅमकडे जाणारा मार्ग पुढे कुठेतरी सापडेल या आशेवर दाट झाडीतील जंगलात बेधडक प्रवेश केला. बुडत्याचा पाय खोलात म्हणतात तसा मार्ग चुकत जंगली प्राण्याच्या अवघड पाऊलवाटेवर येवून पोहचलो. मागे फिरणारी पाऊलवाट दोर कापून टाकल्याप्रमाणे पूर्णपणे तुटून गेली होती. चोहोबाजूला नजर फिरवली. गच्च झाडी, थोडी मान वर केली, दूरवर पसरलेली गर्द झाडी व डोंगराच्या एका पाठोपाठ रांगा, दिशा कळेना, आकाशाकडे पाहिले, मध्यान्हीच्या दिशेने हळुहळू सूर्य वर चढत चाललेला होता. सकाळी दहाच्या दरम्यान सगळ्यांच्या अंगाला घाम फुटला. वाटाड्या घेतला असता, तर बरे झाले असते असे वाटायला लागले. वाटून काय उपयोग, वेळ टळून गेली होती.

शेवटी चर्चेअंती उंच डोंगराच्या माथ्यावर जायचे ठरविले म्हणजे आपण नेमक्या कुठल्या स्पॉटला आहोत ते कळेल. तसेच राधानगरी डॅमकडे जाण्याचा नाद सोडून गगनगड किंवा मोरजाईचा डोंगर धुंडाळण्याचा निर्णय घेतला. कारण हा भाग खूपच उंचावर आहे. ज्या दिशेने भरकट चाललो होतो, बरोबर त्याच्याविरुद्ध दिशेला जाणेचे ठरविले. अतिशय दाट उंच झाडीच्या जंगलात प्रवेश केला. डोंगराच्या उंच दिशेने हळुहळू चढू लागलो. आकाशातील ढगांशी स्पर्धा करणाऱ्या वृक्ष, वेली, वेड्या-वाकड्या वळणाच्या वर वर जाणाऱ्या जंगली जनावरांच्या पुसटश्या पाऊलवाटा, ह्या पाऊलवाटेला लागून खाली दरीच्या दिशेने उतरत्या क्रमाने जाणारी झाडी. तोल गेला तर काही खरं नाही. पण हळुहळू वर जात होतो. ध्येय एकच होते, टॉपला जाणे.

आम्ही या दुर्गम भागातील अशा एका ठिकाणी पोहचलो, डोळे विस्फरून पहायलाच लागलो. सपाट मैदान होते. चोहोकडे पाण्याचे ओहोळ दिसत होते. छोट्या छोट्या वृक्ष वेली होत्या. गुहा दिसत होती. जंगली जनावरांच्या विष्ठा दिसत होत्या. उग्रवास वातावरणात घुमत होता. या विभागातून होता होईल तितक्या लवकर बाहेर पडणे आवश्यक होते. त्या दिशेने आमची धडपड चालली होती. तिघा तिघा जणांचे आम्ही तीन गट केले. ओळखीचा डोंगर प्रदेश कुठे दिसतो कां ? हे पाहण्याचे प्रयत्न करू लागलो. एका छोट्याशा मोकळ्या जागी मी, एस.के. राणे व सुखान्त कोरडे आलो. समोरच्या डोंगरदऱ्याकडे पहात असताना, पाठीमागून उग्रवास येत होता. म्हणून त्या दिशेने पाहिले. मोठी गुहा होती. गुहेतून वास येत होता. जीवाच्या आकांताने तिघांनी धुम ठोकली. बाकीच्या गटांना सावध केले व लागलीच हा परिसर सोडला. पुढे पुढे उंचावर जाऊ लागलो. खूप उंचावर आलो. समोर वाळलेल्या खुरट्या गवताचे मैदान लागले. त्या मैदानातून पुढे निघालो. त्या मैदानाच्या शेवटावर आलो. एका उंच कड्याच्या टोकावर आम्ही सर्वजण उभे होतो. खाली खोल खोल दरी तर दरीच्या पलिकडे गगनबावड्याच्या परिसराचे विस्तीर्ण खोरे, दूरवर पसरलेली हिरवीगार शेती, अनेक ठिकाणी तांबड्या मातीच्या फुटलेल्या अनेक पाऊलवाटा, तर खोऱ्याच्या पलिकडे परत दिसणाऱ्या डोंगररांगा. याच डोंगररांगामध्ये उठून दिसणारा गगनगडचा किल्ला भव्यदिव्य दिसत होता. त्याच्या भव्यतेकडे पहात असताना, डोळे फिरत होते. साक्षात् विशाल गरूड पक्षाने आपल्या पसरलेल्या पंखाच्या आकारासारखा हा किल्ला दिसत होता. फक्त येथूनच असे दृष्य पहायला मिळते. पण हे पाहणार कोण व कसे. इथे येणार कसे ? खूप अवघड आहे. नशिबाने पहावयास मिळते, मनात आले, पक्षाप्रमाणे भरारी मारता आली असती तर चटकन खोऱ्यात गेलो असतो. या कविकल्पनेतून बाहेर यावयास काही काळ गेला, पण मनात उत्साहाची उमेद निर्माण झाली. आलो ते योग्य दिशेला

येवून पोहोचलो होतो. डोळ्यातून आनंदाश्रू ओघळत होते.

पण समोर यक्ष प्रश्न होता. आता पुढील मार्ग कसा शोधून काढावयाचा ? पण मनोमन निर्धाराने एक गोष्ट ठरवून टाकली. वाटेल ते झाले तरी ही अति उंचावरील जंगली वाट सोडावयाची नाही. याच वाटेवरून शिवाजी महाराजांचा जयजयकार करत जिद्दीने पुढे पुढे निघालो. सह्याद्री पर्वतावरील उंचावरून जात असताना दोन्ही बाजूला खोल दरी अटेन्शन (सावधान) च्या पोजमध्ये काठीच्या आधाराने बॅलन्स सांभाळत हळुहळू पुढे निघालो. मनोमन मला वाटत होते, पुढे कोठेतरी मोरजाईचा डोंगर दृष्टीपथाला पडेल. जात असताना वाटेतच एस. के. राणेंच्या हातातील काठी निसटून खाली पडली. ती काठी दरीच्या दिशेने खोल जात होती व आवाज ७-८ मिनिटे घुमत होता. प्रत्येकाने एकमेकांकडे निर्विकार मुद्रेने पाहिले व मुकाट्याने पुढे निघाले.

सायंकाळ होत आली होती. जलद गतीने पुढे जाता येत नव्हते. असेच पुढे जात असताना अंधार पडला तर काय करावे? प्रबळ इच्छाशक्तीची दखल मात्र निसर्ग घेतोच. एक अतिशय उंच डोंगर कपारीआड हळूहळू अस्ताच्या दिशेने जाण्याच्या मार्गावर असणाऱ्या सूर्यनारायणाकडे आम्हां साऱ्यांचे लक्ष गेले आणि आश्चर्याने उड्या मारत त्या डोंगराकडे पाहयला लागलो. साक्षात् तो मोरजाईचा डोंगर होता. अत्यानंदाने एकमेकांना मिठ्या मारत, जिंकली या भावनेने आनंदाश्रू ओघळू लागले. खाली पाहिले. दूर अंतरावर तांबड्या मातीच्या पाऊलवाटा दिसू लागल्या. या वाटेच्या दिशेने कशाचीही तमा न बाळगता खाली आलो. जेव्हा पाऊलवाटेवर आलो, तेव्हा तेथे साष्टांग दंडवत घातले इतका आम्हाला आनंद झाला. इथेच अन्नाचे दोन घास पोटात घातले. जवळ जवळ अखंड १२ तास आम्ही जंगलामध्ये वेडेपिसे होवून मार्ग शोधत होतो. तो मार्ग आम्हाला अशा तऱ्हेने मिळाला.

रात्री १० च्या दरम्यान गगनबावड्याला आलो. आमच्या गोंगाटामुळे गावातील लोक टवकारून पाहू लागले. कोठून आलात म्हणून चौकशी करू लागले. आमचा वृत्तांत ऐकून प्रत्येक गावकऱ्यांनी तोंडात बोट घातले. नशिब फार मोठे बलवत्तर म्हणून सहिसलामत आला. असे प्रत्येकजण म्हणू लागला. गावातील हॉटेल मालकांनी तर गरमागरम जेवणच करून घातले. यावेळी आमच्याबरोबर प्रोबेशनरी ऑफिसर डीन व खुराना होते. डीनच्या तळपायात काटा घुसला होता. हू की चू न करता या वेदना त्यांनी सकाळपासून सहन केल्या होत्या.

स्टॅण्डवरील एस. टी. ड्रायव्हर कंडक्टर यांचे आभार मानावे तेवढे थोडेच. त्यांनी बसमध्ये आम्हाला झोपायला परवानगी दिली व दुसऱ्या दिवशी याच बसने आम्ही कोल्हापूरला आलो.

***- श्री. मारूती बसरीकट्टी***

कोल्हापूर-४१६ ००१

## ❖ 'संवाद' लेख स्पर्धा २००७

''अहो ! असं काय करता ? आज तरी मला बसू दे की खिडकीजवळ ! मी बघून ठेवलंय, तुमचे हे नेहमीचेच आहे.'' पत्नीचे उद्‌गार - बसमधील प्रसंग.

''एक तास झाला. पन्नास साड्या बघितल्या तरी अजून एकही साडी पसंत पडत नाही ? आणखी किती वेळ घेणार ? तुम्हा बायकांचे हे नेहमी असंच असतं'' - पतिराजांचे उद्‌गार -

आपल्या सहजीवनांत असे कितीतरी प्रसंग आपण अनुभवले असतील की, त्यावेळेस आपल्या तोंडून सहज वरील दोन्ही प्रसंगात उद्धृत केलेले उद्‌गार निघाले असतील. असे निरनिराळे प्रसंग शब्दबद्ध करा. स्पर्धेचा विषय असाच निवडला आहे. सहज, सोपा, घरगुती. मग घ्या लेखणी आणि सहभागी व्हा या लेख स्पर्धेत.

स्पर्धेसंबंधी माहिती खालीलप्रमाणे -

**१) पुरुष सभासदांसाठी -**

विषय - **'तुम्हां बायकांचे हे नेहमी असंच असतं !'**

**२) स्त्री सभासदासाठी -**

विषय - **'मी बघून ठेवलंय, तुमचं हे नेहमीचंच आहे !'**

**३) शब्द मर्यादा** - आठशे ते एक हजार शब्द फक्त

**४) लेख पाठविण्याची अंतिम मुदत** - ३१ मार्च २००७

***इतर सूचना -***

१) ही स्पर्धा केवळ स्टेट बँक ऑफ इंडिया पेन्शनर्स असोसिएशनच्या सर्व स्त्री पुरुष सभासदांसाठी व सहसभासदांसाठीच आहे.

२) लेखन आखीव फुलस्केप कागदावरच भरपूर समास सोडून कागदाच्या एकाच बाजूस लिहिलेले असावे. पाठपोट लिहू नये. तसेच अक्षर वाचनीय असावे. लेखाच्या सुरूवातीस उजव्या कोपऱ्यात लेखकाने आपले संपूर्ण नांव, पूर्ण पत्ता, (पिनकोड सहित) सभासद क्रमांक, फोन नंबर लिहावा. तसेच लेखाच्या शेवटी आपली सही त्याखाली नांव, पूर्ण पत्ता, फोन नंबरसहित लिहिणे आवश्यक आहे.

३) लेखाची मूळ प्रतच पाठवावी. झेरॉक्स, कार्बन प्रत पाठवू नये.

४) स्पर्धेसाठी लेख पाठविताना पाकिटावर मोठ्या अक्षरात 'संवाद लेख स्पर्धा २००७' असा स्पष्ट उल्लेख असावा.

५) लेखनासंबंधीच्या सर्व सूचनांचे पालन करणे आवश्यक आहे. सूचनांचे उल्लंघन करून आलेल्या लेखांचा स्पर्धेसाठी विचार केला जाणार नाही. याची लेखक सभासदांनी नोंद घ्यावी.

६) संपादक मंडळाचा निर्णय अंतिम राहील.

स्पर्धेचा निर्णय मे २००७ च्या 'संवाद' मध्ये प्रसिद्ध होईल व विजेत्यांना त्यांची पारितोषिके या वर्षीच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत अध्यक्षांच्या हस्ते प्रदान करण्यात येतील.

**पारितोषिकांचे स्वरूप :-**

| **पुरूष विभाग** | **महिला विभाग** |
|---|---|
| १) प्रथम क्रमांक रू. ५००/- | १) प्रथम क्रमांक - रू. ५००/- |
| २) द्वितीय क्रमांक रू. ३००/- | २) द्वितीय क्रमांक - ३००/- |
| ३) तृतीय क्रमांक रू. २००/- | ३) तृतीय क्रमांक - रू. २००/- |

या लेख स्पर्धेत जास्तीत जास्त सभासद सहभागी होतील अशी खात्री आहे. **- संपादक मंडळ**, 'संवाद'

## ❈ नागपूर विभागीय उपकेंद्र

**अमरावती वृत्त** : अमरावती मुख्य शाखेत वैद्यकीय सेवेचे उद्‌घाटन बँकेचे सहा.महाव्यवस्थापक श्री.कमलाकर रास्ते यांचे हस्ते १८ डिसेंबर २००६ रोजी करण्यात आले. ही सेवा अमरावती शहरातील बँकेचे कर्मचारी तसेच सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांनाही उपलब्ध होती. परंतु मध्यंतरी मानद वैद्यकीय अधिकाऱ्याच्या नियुक्ती अभावी ती खंडित झाली होती. ही वैद्यकीय सेवा पुन्हा सुरू व्हावी म्हणून स्थानिक पेन्शनर्स संघटनेने खूप प्रयत्न करून ती चालू ठेवण्यात यश मिळवले. अमरावती येथील विख्यात शल्यविशारद डॉ.एस्.डी.पाठक यांची मानद वैद्यकीय अधिकारी म्हणून बँकेने नियुक्ती केली आहे. ही सेवा पुन्हा सुरळीत सुरू व्हावी म्हणून स्टेट बँक कर्मचारी व अधिकारी संघटना, तसेच आपल्या नागपूर विभागीय उपकेंद्राचे सचिव श्री.जयंत वकील यांचे मोलाचे सहकार्य मिळाले. ह्या सेवेचा लाभ सर्व विद्यमान कर्मचारी व त्यांचे कुटुंबीय तसेच सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांनाही होणार असल्याने त्याबद्दल येथील सेवानिवृत्तांच्या स्थानिक संघटनेने समाधान व्यक्त केले आहे.

**- अविनाश निमदेव**, सचिव (अमरावती)

**नागपूर वृत्त** : जागतिक वृद्ध दिन २००६

१ ऑक्टोबर २००६ चा जागतिक वृद्धदिन ह्या वर्षी नागपूर ज्येष्ठाच्या फॅशन शो स्पर्धेने गाजला. निरनिराळ्या वेषातील ज्येष्ठ नागरिक नाचताना पाहून सुना मुले नातवंडांनी आनंद व्यक्त केला. आपल्या नागपूर पेन्शनर्स असोसिएशनचे सहसचिव श्री.अशोक पात्रीकर ह्यांना ह्या प्रसंगी ''हेल्पेज इंद्रियां' चा सर्वोत्कृष्ट व्यक्तिमत्त्व पुरस्कार देण्यात आला. श्री.अशोक पात्रीकर हे पेन्शनर्स असो, संजिवनी प्राणायम वर्ग, रामनगर ज्येष्ठ नागरिक संघ, अध्यात्म मंदिर अशा अनेक संस्थात काम करतात. पेन्शनर्स असो.तर्फे त्यांचे मन:पूर्वक अभिनंदन ! ***- सचिव (नागपूर)***

## ❈ 'विदर्भ मेळावा २००७

कळविण्यास आनंद होतो की आपल्या सभासदांचा वार्षिक मेळावा रविवार दि. १८ फेब्रुवारी २००७ ला सकाळी ९.३० वाजता बँकेच्या आंचलिक कार्यालयाच्या आवारात संपन्न होणार आहे. सर्व सभासदांना (पेन्शनर्स, कौटुंबिक वेतन धारक व असोसिएट मेंबर्स) नम्र विनंती आहे की आपण उभयतां ह्या वार्षिक विदर्भ मेळाव्यास उपस्थित राहून कार्यक्रमाला शोभा आणावी. ह्या कार्यक्रमाचे अतिथीपद उपमहाव्यवस्थापक श्री राम रस्तोगी ह्यांनी स्विकारले आहे.

ह्या कार्यक्रमासाठी सर्वश्री बी.जी.दांडेकर, फेडरेशन प्रेसिडेंट, व्ही.एम.गोखले, सर्कल प्रेसिडेंट, आर.एन.लळिंगकर, सेक्रेटरी व एस.बी.गोखले, फेडरेशन जनरल सेक्रेटरी उपस्थित राहणार आहेत. ***- ज.स.वकील***

## ❈ स्नेहसंमेलन

स्टेट बँक पेन्शनर्स क्लब नागपूर वार्षिक स्नेहसंमेलन रविवार दि. २६ नोव्हेंबर २००६ रोजी सकाळी १० वाजता 'सुदर्शन हॉल' आर वी टी एस रोड नागपूर येथे श्री. ई.डी. काळबांदे यांचे अध्यक्षतेखाली संपन्न झाले. स्नेहसंमेलनाचे मुख्य पाहुणेपद श्री. वाय. एस. औरंगाबादकर यांनी भूषविले. कार्यक्रमाची सुरुवात प्रमुख पाहुणे श्री.औरंगाबादकर यांचे हस्ते दीप प्रज्वलन करून आणि नागपूर सब सेंटरचे संस्थापक कै.वामनराव देगवेकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून करण्यात आली.

स्व.अनिल कुलकर्णी (S.B.I. Pensioner) ह्यांच्या स्मृती प्रित्यर्थ त्यांच्या दोन चिरंजिवांनी त्यांचा स्वरांजली नावाचा गाण्याचा दोन तासाचा उत्कृष्ठ कार्यक्रम सादर केला. श्री.किशोर गलांडे (संचालक), श्री.अजित व अमर कुलकर्णी, सायली जोशी व इतर कलाकार ह्यांनी शास्त्रीय, भावगीते व जुन्या सिनेमातील एकंदर १५ गाणी गावून वातावरण आनंदमयी व रसिकांना मंत्रमुग्ध केले. सर्वश्री अमर व अर्जित हे रेडिओ व टि.व्ही. कलाकार आहेत.

प्रमुख पाहुणे श्री.औरंगाबादकर Retd.G.M. सभेला संबोधित करताना म्हणाले की सेवानिवृत्त झाल्यानंतर जीवन आनंदी जगावे. दु:ख आणि तणाव यावर मात करावी. प्रकृतीकडे विशेष लक्ष द्यावे. पैशाचा योग्य विनीयोग करावा. घरात कमीत कमी बोलावे. Art of listening हवी. दु:ख कमी होईल. हा माझा स्वत:चा अनुभव आहे.

## ❈ महत्त्वाचे

विदर्भातील सर्व पेन्शनर्स व कुटुंब निवृत्ती वेतन घेणाऱ्या सभासदांना विनंती करण्यात येत आहे की बँकेविषयी काही समस्या असतील, जसे फॅमिली पेन्शनची मंजुरी, प्रॉव्हिडंट फंडाची जमाबाकी किंवा व्याज, MWS पेन्शन, MWS ची जमा रक्कम मिळण्याबाबत, वगैरे. तर आपण लवकरात लवकर बँकेशी केलेल्या पत्राच्या झेरॉक्स प्रति व एक विस्तृत पत्र (संपूर्ण पत्ता, पिनकोड व फोन सहित) सचिवांच्या खालील पत्यावर पाठवावे.

आपल्या समस्येचे निराकरण जास्तीत जास्त मार्च २००७ पर्यंत करण्याकरता विभागीय उपकेंद्र नागपूर भगीरथ प्रयत्न करेल.

पत्ता : वकीलांचा 'ग्रे' बंगला, काँग्रेसनगर, नागपूर ४४००१२.
दूरध्वनी : ०७१२-२४५५४०४.

SBI ADVT.

**Regd. under RNI No. MAHBIL04149/13/1/2003-TC & Declaration No. PHM/SR/12/VIII/2004**
**SSPO Pune u nder Postal Concession register No. L2/RNP/M/318/04-07 Date :13/05/2004**
**Licence to post without Prepayment No. : LWP-217 at Market Yard PSO, Pune - 37 on 25th of each Month**

## ❈ वृत्त

आपल्या बँकेचे एक सेवानिवृत्त अधिकारी श्री नारायण सखाराम तथा श्री नानासाहेब भागवत हे गेली २५ वर्षांहून अधिक काळ ''वात्सल्य ट्रस्ट'' या सेवाभावी संस्थेच्या माध्यमातून निरपेक्ष समाज सेवा करीत असल्याचे संवादचे वाचकांना माहित आहेच. त्यांच्या या रौप्यमहोत्सवी समाज कार्याचा गौरव तसेच त्यांच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त, त्यांचे अभिष्ट चिंतन करण्याच्या उद्देशाने, त्यांच्या पुणे आणि मुंबई येथील मित्रांनी १७/१२/२००६ या दिवशी, सरस्वती विद्या मंदीर, ठाणे, या संस्थेच्या सभागृहात सत्कार समारंभ आयोजित केला होता.

कार्यक्रमाची सुरूवात पींच सुवासिनींनी श्री.नानांचे औक्षण करून व ७५ दीप प्रज्वलित करून झाली. नंतर ईशस्तवन होऊन मंत्रघोष झाला. तदनंतर शाल आणि श्रीफल देऊन सत्कार करण्यात आला. तसेच या समारंभाचे निमित्ताने 'वात्सल्य ट्रस्ट' साठी देणगीच्या रुपाने जमा करण्यात आलेला एक लक्ष तीन हजार रुपयांचा निधि श्री नानासाहेबांना अर्पण करण्यात आला. तो त्यांनी वात्सल्य ट्रस्टकडे सुपूर्त केला.

त्या प्रसंगी सर्वश्री गजेंद्र गडकर, गुर्जर बंधू, खांडेकर आणि सौ.गाडगीळ यांनी आपल्या मनोगतांत श्री नानांच्या प्रेरणादायी व्यक्तिमत्त्वाचे अनेक पैलू उलगडून दाखविले व त्यांना दीर्घ आयुरारोग्य लाभावे अशी प्रार्थना केली. श्री नानाजींनी त्यांच्या भाषणांत वात्सल्य ट्रस्टचे कार्य समाजाच्या भरघोस मदतीनेच उभे राहिले आहे व विस्तारले असल्याचे सांगून हा लोभ असाच रहावा अशी इच्छा व्यक्त केली. शेवटी आभार प्रदर्शन व पसायदान होऊन कार्यक्रमाची सांगता झाली. कार्यक्रमाचे नेटके सूत्र संचालन सौ.ज्योति शहाणे यांनी केले.

**प्रेषक - वि.ह.गुर्जर**

*********

## ❈ अभिनंदनीय

कान्हाटी, ता.बारामती येथे ''उष:काल वृद्धाश्रम ट्रस्ट'' आहे. हा वृद्धाश्रम श्रीमती उषाताई आगरकर यांच्या स्मरणार्थ त्यांचा भाचा श्री.अरविंद केळकर व सौ.रेवती केळकर ह्यांनी स्थापन केला असून तेथे ज्येष्ठ नागरिकांची निवासाचीही सोय करण्यात आली आहे. आपल्या पेन्शनर्स असोसिएशनच्या सदस्या श्रीमती सुषमा भालचंद्र देव ह्या सौ.केळकर ह्यांच्या भगिनी असून ह्या आश्रमात त्या सतत सेवेला असतात. मित्रमैत्रिणीकडून संस्थेला मदत करतात व स्वत:ही तनमन धनाने संस्थेला सर्व प्रकारची मदत करतात. पेन्शनर्स असोसिएशनतर्फे त्यांचे मन:पूर्वक अभिनंदन.

**सूचना** : **१) या मासिकांत प्रसिद्ध झालेल्या लेखांतील मतांशी संपादकमंडळ सहमत असेलच असे नाही. तसेच जाहिरातीतील मजकुराची सत्यासत्यता सभासदांनी स्वतः पडताळून घ्यावी. त्याबाबत असोसिएशन वा 'संवाद' चे संपादुक मंडळ जबाबदार असणार नाही.**
**२) असोसिएशनचे कार्यालय, सोमवार ते शुक्रवार, संध्याकाळी ६ ते ७.३० या वेळातच उघडे असते. याची कृपया नोंद घ्यावी.**

**Printed Matter**

***If Undelivered Please Return to :***
**STATE BANK OF INDIA PENSIONERS' ASSOCIATION, (MUMBAI CIRCLE), PUNE**
**Anubandh, Building No. B-2, 4th Floor,**
**Block No.16, Near Ramkrishna Math,**
**Sinhagad Road, Pune - 411030. Ph:24332141**

To,

**प्रकाशक :** श्री. रा. ना. लळिंगकर, सेक्रेटरी, स्टेट बँक ऑफ इंडिया पेन्शनर्स असोसिएशन (मुंबई सर्कल), पुणे.
**संपादक मंडळ :** सर्वश्री. वसंत धुपकर, प्रभाकर गुपचुप, शरद शिंगवेकर, श्रीधर सहस्रबुद्धे, क्रांतिसेन आठवले, वसंत महाजन